## सुवर्णकार संघटने कडून आ सईताई डहाके यांचा सत्कार

**मानोरा :--** कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या आ सईताई डहाके यांचा सत्कार १ जानेवारी ला तिरुपती ज्वेलर्सचे संचालक रमेश वर्मा यांनी केले. कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या आ. सईताई डहाके हया १ जानेवारी ला मानोरा येथे आल्या असता त्यानी तिरुपती ज्वेलर्स या दुकानाला भेट दिली यावेळी तिरुपती ज्वेलर्सचे संचालक रमेश वर्मा यांनी सईताई डहाके यांचा सत्कार केला. यावेळी सुवर्णकार संघटना यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन डहाके यांनी दिले. यावेळी सहकार नेते सुरेश गावंडे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष महादेवराव ठाकरे, माजी सभापती राजेश नेमाने, सरपंच गोविंद चव्हाण, बबनराव देशमुख, राजू ठाकरे, संजय राठोड आदी मान्यवर उवस्थित होते.

# मृतक सोनाली कोडापे यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या

### अखिल भारतीय विकास परिषदेच्यावतीने मूक मोर्चा काढून दिले निवेदन

**दै.महासागर वृत्तसेवा**

**कारंजा/ तालुका प्रतिनिधी -** तालुक्यातील ग्राम खेर्डा जीरापुरे येथील मृतक सोनाली कोडापे रा.खेर्डा यांच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्नात सदर महिलेची हत्या करण्यात आली होती कारंजा शहर पोलिसानी एका दिवसात तपासाचे चक्र फिरवुन आरोपीना गजाआड केले असले तरी अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी या बाबत ची निवेदन पोलिस निरीक्षक कारंजा (लाड) व कारंजा तहसील कार्यालयात तहसीलदार यांना अखिल भारतीय विकास परिषद वतीने मुक मोर्चा काढून आज दिनांक ०७/०१/२०२५ रोजी सादर करण्यात आले सविस्तर वृत असे की,, वाशिम जिल्हयातील कारंजा लाड पोलिस स्टेशन अंतर्गत येणारे गा. खेर्डा या गावातील सोनाली कोडापे (वय ३४ वर्ष) आदिवासी महिला दिनांक ०३/०१/२०२५ ला सकाळी बकऱ्या चारण्या करीता जंगलात गेली असता दुपारी तिच्या रक्ताच्या धारोळ्यात संशयास्पद मृतदेह आढळा असून तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय येत असून महिलेने अत्याचाराचा प्रतिकार . केल्याने कोयत्याने तिच्यावर अनेक वार केल्याचे दिसून




येते आहे सदर महिलेला दोन चिमुकली मुले असून घडलेली घटना अतिशय निंदनीय आहे अखिल भारतीय विकास परिषद सदर घटनेचा निषेध करत सदर चौकशी करून अजून काही आरोपी आहे का याचा शोध घ्यावा या प्रकरणात दोषी आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी करिता मोर्चेत बहुसंख्येत महिला व पुरुष वर्ग हजर होते.

## मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षक प्रशिक्षणार्थी यांना कार्यकालवाढ व वेतनवाढ व्हावा

### तालुका अध्यक्ष पवन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री यांना निवेदन



**दै.महासागर वृत्तसेवा**

**कारंजा/ तालुका प्रतिनिधी -** मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षणार्थी तालुक्यातील सर्व शासकीय आस्थापना अंतर्गत सर्व शिक्षिका तसेच शिक्षक यांनी तहसीलदार तसेच गट शिक्षणधिकारी श्रीकांत माने तसेच गट विकास अधिकारी राणे मॅडम यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कार्यकालवाढ व वेतनवाढ व्हावे करिता निवेदन देण्यात आले. मुख्यमंत्री कार्य शिक्षक प्रशिक्षणार्थी ह्यांचा कार्यकाल लवकरच संपुष्टात येत असल्यामुळे त्यांना पुढील काळात बेरोजगारीची समस्या निर्माण होईल.पुढील काळात शासणाकडुन रोजगार मिळावा ह्या हेतुने तसेच प्रशिक्षणार्थी यांचा आर्थिक गरजा पुर्ण व्हाव्यात ह्या हेतुने निवेदन देण्यात आले असुन ह्या निवेदणाकरीता तालुका शिक्षक संघ अध्यक्ष पवन घुगे सचिव प्रविण भगेवार सर महासचिव प्राप्ती महल्ले मॅडम कोषाध्यक्ष गौरी राऊत प्रसिद्धिप्रमुख राधेश्याम घुगे सर शिक्षक प्रशिक्षणार्थि निलेश भेंडे शुभम करडे नंदकिशोर साबळे भाग्यश्री शिंदे मॅडम श्वेता चिरडे मॅडम प्रियंका फोकमारे मॅडम रवि घाटे सर दत्ता पाटील, शेख मेहमूद शेख मेहबूब, मोहम्मद अदनान मोहम्मद जाफर, किरण गाडगे, संगीता गवई, अन्नु काकड, सोनाली मनवर, श्रुती मुगल, मनीषा बाकल, समृद्धी मनवर ,कोमल नागपुरे आदी शिक्षक प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### वर्ग ६ वी ची जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षा १८ जानेवारी रोजी

**वाशिम-** या परीक्षेकरीता ८ हजार ७७४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज केलेले आहेत. या परिक्षेचे प्रवेश पत्र ऑनलाईन पध्दतीने काढण्यास सुरुवात झाली आहे. हे प्रवेश पत्र काढण्यासाठी लिंक ला जावून https://cbesitms.rcil.gov.in/nvs/AdminCard/AdminCard संकेत स्थळावरुन रजिस्ट्रेशन व विद्यार्थ्यांची जन्मतारीख टाकून काढता येईल. तसेच प्रवेश पत्र दोन प्रती मध्ये काढून त्यावर मुख्याध्यापकाची स्वाक्षरी घेवून एक प्रत परिक्षेच्या वेळी जमा करावी लागेल. तरी सर्व पालकांना, विद्यार्थ्याना व शिक्षकांना वरिल परिक्षेचे प्रवेश पत्र लवकरात लवकर ऑनलाईन पध्दतीने डाउनलोड करुन घ्यावेत असे नवोदय विद्यालयाचे प्राचार्य खरात यांनी सांगीतले.

## मानोरा येथे मराठी पत्रकार दिन साजरा; ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार

**मानोरा/ तालुका प्रतिनिधी -** मराठी पत्रकारितेचे जनक, दर्पणकार, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती व मराठी पत्रकार दिन, मानोरा तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने साजरा करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ पत्रकार यांचा सत्कार करण्यात आला. स्थानिक विश्राम गृहावर ६ जानेवारी रोजी मराठी पत्रकार परिषद,ता मानोराच्या वतीने आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका अध्यक्ष प्रविण ठाकरे यांची उपस्थीती होती.तर माजी विभागीय सचिव जगदीश राठोड,ज्येष्ठ पत्रकार जे.डि.खुणे,देवीदास पारस्कर यांची प्रमुख उपस्थीती होती. सर्वप्रथम आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण मांन्यवरांचे हस्ते करण्यात आले.तालुका पत्रकार संघाच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार जे.डि.खुणे,देवीदास पारस्कर व जगदीश राठोड यांचा यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पत्रकार सुदाम तायडे,बलवंत भगत, जगदिश राठोड कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रविण ठाकरे यांनी यावेळी आपले विचार मांडलेत.कार्यक्रमाचे संचालन प्रविण आडुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष कांबळे यांनी मानलेत.कार्यक्रमाला राम हेडा,राजेंद्र दिक्षीत,मुंगशीराम उपाध्ये,संतोष इंगोले,गौतम भगत,अरविंद राठोड,मनोज आडे,अफसर शाह,प्रमोद आडे,गजानन गिऱ्हे आदिंची उपस्थीती होती.



## ३६ वे रस्ता सुरक्षा अभियान: वाशिम शहरात हेल्मेट रॅलीचे आयोजन उत्साहात

**वाशिम/ प्रतिनिधी -** ३६ वे रस्ता सुरक्षा अभियान दि. १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वाशिम कार्यालयातर्फे साजरा करण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत परिवहन विभागाकडून रस्ता सुरक्षा संदर्भात जनतेमध्ये जनजागृती व्हावी. याकरीता वेगवेगळे कार्यक्रम राबविले जात आहेत. मोटार सायकल वाहन चालकामध्ये हेल्मेट वापराबाबत जनजागृती व्हावी याकरीता दि. ३ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता परिवहन विभागाचे अधिकारी व कर्मचारी, महिला वर्ग, मोटार ड्रायव्हिंग स्कुल, पी.यु.सी. केंद्र, वाहन विक्रेते यांनी प्रत्यक्ष सहभाग घेवून शहारामध्ये मोटार सायकल रॅलीचे आयोजन केले. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्रामकुमार जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार वाहन निरीक्षक विनोद घनवट,पोलीस निरीक्षक शहर वाहतुक शाखा संतोष शेळके यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरूवात झाली. या रॅलीला पोलीस स्टेशन चौकातून आंबेडकर चौक, पाटणी चौक,



अकोला नाका, जिल्हा सामान्य रुग्णालय येथून उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात रॅलीची सांगता करण्यात आली. रॅलीमध्ये शहर वाहतुक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक जाधव, मोटार वाहन निरीक्षक डी. पी. सुरडकर, एस. आर. पगार तसेच सहायक मोटार वाहन निरीक्षक एस. पी. सरागे, एस. बी. इंगळे, एम. आर. टवलारकर, जे. डी. काटे. आर. ए.विनकरे, एम. डी. मोरे, लाखन पठाण व कार्यालयीन सर्व कर्मचारी सहभागी होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचा?यांनी पुढाकार घेतला.

## पत्रकारीतेमधील मुल्यांची जपणूक करीत समृद्ध पत्रकारीता करावी

### जिल्हा माहिती कार्यालयातील पत्रकार दिन कार्यक्रमातील सूर; पत्रकार दिन उत्साहात साजरा

**दै.महासागर वृत्तसेवा**

**वाशिम/ प्रतिनिधी -** पत्रकारीतेमध्ये मूल्य जोपासले गेले पाहिजे. या मूल्यांच्या बळावरच समृद्ध पत्रकारीता करता येते. पत्रकार समाजाचा पाईक म्हणून कार्य करतो. समाजातील विविध समस्यांचा विषयनिहाय उलगडा करतो. पत्रकारांच्या लेखनीमधूनच अशा विविध सामाजिक समस्यांना वाचा फोडल्या जाते. या समस्यांकडे शासन, प्रशासनाचे लक्ष जावून तिथे शाश्वत विकास घडतो, असा सूर पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात निघाला.

कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी काढले होते. त्यानिमित्त हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने आज दि.६ जानेवारी रोजी जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मराठी पत्रकारसंघाचे माजी राज्याध्यक्ष तथा जिल्हा पत्रकार



परिषदेचे जिल्हाध्यक्ष माधवराव अंभोरे, पत्रकार सर्वश्री अनिल कुमार वाल्ले, नंदकिशोर वैद्य, सुनील मिसर, शिकरचंद बागरेचा, सुनील गाडेकर, बबनराव खिल्लारे, रमेश उंडाळ, दत्ता महल्ले, अजय ढवळे, गणेश भालेराव, मंकेश माळी, अंतिम देशमुख, मनोज जयस्वाल, संदीप पिंपळकर, पप्पु घूगे, किरण पडघान, सुनिल बांगर, रवि राऊत,जिल्हा माहिती अधिकारी यासेओद्दीन फहद काझी यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयाचे राजू जाधव, हर्षराज हाडे व अमोल जाधव यांच्यासह आदीपत्रकार बांधवांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## प्लॅस्टिक कपवर बंदी घाला; तहसीलदारांना निवेदन



**रिसोड / तालुका प्रतिनिधी -** चहा पिण्यासाठी वापरण्यात येणा?या प्लास्टिक कपावर बंदी घालावी, अशी मागणी करीत पथविक्रेता सदस्यांच्या वतीने तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश शेवदा यांना दि. ३ जानेवारी रोजी निवेदन दिले. तहसीलदारांना दिलेल्या निवेदनानुसार, सध्याच्या काळात प्लास्टिक, कागदी कपाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. प्लास्टिक, कागदी कप बनविताना त्यामध्ये केमिकलचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे त्या कपात गरम चहा किंवा गरम पाणी टाकल्यास कपाच्या आतील भाग वितळतो. कपातून लाखो मायक्रो प्लास्टिकचे कण पोटात जातात. त्यामुळे कॅन्सर सारखा आजार होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे प्लास्टिक कागदी कपावर तत्काळ बंदी आणून प्लास्टिक कागदी कप विकणारे व हॉटेलमध्ये वापर करणा?या दुकान मालकावर योग्य ती कारवाई करावी, शहरात प्लास्टिक कपवर बंदी घालावी, अशी मागणी निवेदनातून केली आहे. प्लास्टिक, कागदी कपावर बंदी आणण्यासाठी पुढाकार घेऊन कारवाई मोहीम राबवावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देताना पथविक्रेता सदस्य जालिंदर देवकर, प्रभाकर सराफ, संदीप सोनटक्के, रामकिसन शिंदे, रेखाताई गवळी, कल्पना जुमडे, गजानन निखाते, माजी नगरसेवक फैयाज भाई यांच्यासह पथविक्रेता सदस्य उपस्थित होते.

## धामणी (मानोरा) येथे राज्यस्तरीय लेखिका संमेलन; नामवंत महिला कवी, लेखिकांचा सहभाग

**मानोरा -** मराठा सेवा संघ प्रणीत जगतगुरू तुकोबाराय साहित्य परिषद वतीने धामणी (मानोरा) येथील एल.एस.पी.एम. हायस्कूलच्या स्व. भीमराव पाटील सभागृह येथे ५ जानेवारीला राज्यस्तरीय लेखिका संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात नामवंत लेखिका कवयित्रींनी सहभाग नोंदविला. राज्यस्तरीय लेखिका संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेत्री, लेखिका, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. विचारपीठावर आमदार सई डहाके, परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ, विभागीय अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन घोंगटे, स्वागताध्यक्ष माजी प्राचार्य व्ही. बी. पाटील, बालाजी जाधव, परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य संजय हांडे, सचिव प्रा. विलास गांजरे उपस्थित होते. संत तुकाराम, जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन करून संमेलनाने उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. यावेळी संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. लिना निकम यांनी अलीकडच्या काळात महिला लिखाण करीत नसल्याबद्दल खंत व्यक्त केली. त्या म्हणाल्या की, अलीकडच्या काळात मोजक्याच

लेखिका साहित्य निर्मिती करीत आहेत. मोबाइल आल्यापासून वाचन कमी झाले. वाचन, लेखनाशिवाय माणूस पूर्ण होत नाही. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांची कास




धरून माणूस प्रधान साहित्य निर्माण जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद लेखिका संमेलन राज्यस्तरीय झाले पाहिजे. महिलांनी, मुलींनी आपल्या भावना, विचार दाहकतेने लिखाणातून मांडल्या पाहिजेत, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी उद्घाटनपर भाषण केले. याप्रसंगी आमदार सई डहाके, डॉ. सतीश तराळ, सत्कारमूर्ती व्ही. बी. पाटील, प्रा. गजानन घोंगटे, बालाजी जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य संजय हांडे यांनी प्रास्ताविक केले. शिक्षिका प्रभा देशमुख यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. विलास गांजरे यांनी आभार मानले. दुस-्या सत्रात एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन या विषयावर परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी डॉ. सतीश तराळ होते. त्यामध्ये डॉ. पद्मिनी दुरुगकर, प्रा. कीर्ती काळमेघ, धनश्री पाटील, प्रा. सिम्रेला देशमुख यांनी सहभाग घेतला. तिस?्या सत्रात कथाकथन झाले. त्यात डॉ. अनघा सोनखासकर शोभा रोकडे, अरुणा बोंडे, डॉ. नेहा भटकर यांनी त्यांच्या कथा सादर केल्या. त्यानंतर कवी संमेलन झाले. त्यात अनेक कवयित्रींनी सहभाग घेतला. संमेलनात घेतले हे ठराव । आत्महत्या केलेल्या शेतकयांच्या कुटुंबासाठी शासनाने महामंडळ स्थापन करावे. या माध्यमातून त्यांना कायम स्वरुपी मदत करावी. । मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला, मराठी विद्यापीठ स्थापन झाले यांचा आनंद आहे. या अंतर्गत बोली अकादमीची स्थापन करावी. शासनाने खास लेखिकांच्या साहित्य संमेलनासाठी अनुदान आणि लेखिकेला मानधन द्यावे. । लेखिकांच्या पुस्तक प्रकाशना साठी अनुदान द्यावे. लेखिकांसाठी पुरस्कार सुरु करावे. । आदिवासी, भटक्या तांड्यावर व ग्रामीण भागावर येणा?या लेखिकासाठी खास पुरस्कार शासनाने सुरु करावे आदी विषयावर उपस्थितांनी आपले मते व्यक्त केली.

## वाशिम जिल्हास्तरीय पोलीस महिला दक्षता समितीत भावना सरनाईक यांची निवड

**वाशिम-** वाशिम जिल्हा स्तरीय पोलीस महिला दक्षता समितीतभावना सरनाईक यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांना ॲडिशनल एसपी मॅडम यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.याबाबत भावना सरनाईक यांनी सांगितले की,ही निवड माझ्या व वाशिम जिल्ह्याच्या पोलीस प्रशासनासाठी मोठा आदर्श ठरेल. महिलांना सुरक्षेच्या बाबतीत सशक्त बनवण्यासाठी मी खूप प्रयत्न करू.तसेच, वाशिमचे लोकप्रिय आमदार श्याम भाऊ खोडे यांनी वाशिम पोलीस जिल्हा अधीक्षक कार्यालय येथे भावना सरनाईक यांचे अभिनंदन केले. आमदार श्री खोडे यांनी महिला सशक्तीकरणाच्या दिशेने पोलीस प्रशासनाच्या कार्याची प्रशंसा केली आणि भवाना सरनाइक यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वाशिम जिल्हयातील महिलांना अधिक सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांना सुरक्षितता प्रदान करण्यासाठी पोलीस प्रशासनाने घेतलेल्या या महत्त्वपूर्ण पावलामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.



# दिव्यांगाचे पं. स. मध्ये विष प्राशन

## अतिक्रमण हटविल्यामुळे तसेच घरकुलासाठी केले विष प्राशन, प्रकृती गंभीर





**खामगाव (का.प्र.)** : तालुक्यातील कोलोरी येथील रहिवासी दिव्यांग दत्तात्रय शेषराव टिकार (६६) यांनी ग्रामपंचायत सरपंच व सचिव तसेच पंचायत समिती येथे विनंती अर्ज केला होता.

त्यामध्ये शासकीय जागेवर घरकुल बांधुन देण्याची व जि.प. शाळेच्या बाजुला असलेले अतिक्रमण काढण्याची मागणी केली होती.

संबंधितांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे दत्तात्रय टिकार यांनी पं.स. कार्यालय आवारात आज ७ जानेवारी २५ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास विष प्राशन केले. त्यामुळे दत्तात्रय टिकार यांची प्रकृती आवारातच बिघडली होती व ते जमीनीवर तडफडत होते. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिस घटनास्थळी पोहोचले होते व त्वरीत दत्तात्रय टिकार यांना सामान्य रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले. त्यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे अतिदक्षता विभागात भरती करण्यात आले.

# ई-हक्क प्रणालीवर आता ऑनलाईन फेरफार नोंदी

## नागरिकांनी लाभ घ्यावा- जिल्हाधिकारी

**बुलढाणा (जिमाका)** डिजीटल इंडिया भूमी अभिलेख आधुनिकरण कार्यक्रमांतर्गत शेतकरी व नागरिकांसाठी शेतजमिनीसंदर्भातील ११ प्रकारचे फेरफार नोंदी ऑनलाईन करण्याची सुविधा ई-हक्क प्रणालीव्दारे उपलब्ध करुन दिली आहे. या प्रणालीद्वारे नागरिक व शेतकऱ्यांना शेतजमीनीचे फेरफार नोंदी करणे सुलभ होणार असून ई-हक्क प्रणालीचा जास्तीत जास्त लाभ शेतकरी व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. सर्वसामान्य नागरिकांना वेगवेगळया सेवांसाठी शासकीय कार्यालयामध्ये जाऊन कागदपत्र सादर करावे लागतात. नागरिकांचा हा त्रास कमी व्हावा आणि त्यांना कालर्यादेत नोंदी उपलब्ध होण्यासाठी शासनाने ई-हक्क प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणाली व्दारे विविध प्रकारच्या ११ प्रकारचे फेरफार नोंदीसाठी ऑनलाईन सुवधि उपलब्ध करुन दिली आहे. नागरिकांना या सेवेचा लाभ घेण्यासाठी pdeigr.maharashtra.gov.in/frmLogin या संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी करावी लागते. संकेतस्थळावर गेल्यानंतर नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे.

तेथे जाऊन नोंदणी केल्यानंतर युजर आयडी व पासवर्ड टाकून विहीत माहिती भरावी. ई-हक्क प्रणालीवर ई-करार नोंदी, बोजा चढविणे/गहाण्खत, बोजा कमी करणे, वारस नोंद, मृतांचे नाव कमी करणे, अ.पा.क. शेरा कमी करणे,ए.कु.मे. नोद कमी करणे, विश्वस्तांचे नाव बदलने, खातेदाराचे माहिती भरणे, हस्तलिखित व संगणीकृत सातबारामध्ये तफावत दुरुस्ती करणे व मयत कुळाची वारस नोंद अशा ११ प्रकारच्या फेरफार सुविधा शेतकऱ्यांना करता येईल. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपले संबंधित तहसिलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांचे कार्यालयास संपर्क साधावा.

## जिल्हा रुग्णालयात आरोग्य तपासणी शिबीर

**बुलढाणा (जिमाका)** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमा अंतर्गत जिल्ह्यातील आरबिएसके संदर्भीत हृद्यरोग असलेल्या ० ते १८ वयोगटातील बालकांची २ डि-इको तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर जिल्हा स्त्री रुगणालय बुलढाणा येथे सोमवार १३ जानेवारी रोजी सकाळी वाजेपासुन सुरु होईल. या तपासणी शिबीराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेत वीज देयक शून्य

**बुलढाणा (जिमाका)** : प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना ही सरकारने ग्रामीण भागातील गरीब आणि वंचित कुटुंबांना वीज उपलब्ध करून देण्यासाठी राबवलेली योजना आहे. या पर्यावरणपूरक योजनेचा जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. ग्रामीण महाराष्ट्रासाठी वीज ही केवळ मूलभूत गरज नाही, तर एक विकासाची संधी आहे. ' जिल्ह्यात योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी 'महावितरण'कडून विविध माध्यमातून योजनेचा प्रसार करण्यात येत आहे.

# पत्रकारावर झालेल्या भ्याड हल्लाच्या निषेधार्थ पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन




**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी)** बुलढाणा येथील शासनमान्य साप्ताहिक विदर्भ प्रेमचे संपादक प्रेम कुमार राठोड यांच्यावर पत्रकार दिनीच गणेश बुधवत नामक व्यक्तीने भ्याड हल्ला केला आसल्याची घटना बुलढाणा येथे दुपारी एक वाजेच्या दरम्यान घडली.

लोकशाहीचा आधार स्थंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारावर समाज कंठकांच्या वतीने नेहमीच हल्ले होत आसल्याच्या घटना सर्वत्र पहावयास मिळते. या होणाऱ्या घटनांमुळे पत्रकारांना आपल्या लेखनीतुन समाजाला योग्य तो न्याय देण्यस अडथळे निर्माण होत आसल्याचे दिसुन येते. पत्रकारावर होणारे हे भ्याड हल्ले कुठेतरी थांबावे व पत्रकारांना संरक्षण मिळावे या साठी शासनाने कठोर कायद्याची तरतुद करावी जेने करुण पत्रकारांवर होणारे हल्ले थांबतील.

बुलढाणा येथे सहा जानेवारी रोजी पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्याच्या निषेधार्थ देऊळगाव राजा येथील पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या प्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्या नुसार आरोपी विरोधात गुन्हा दाखल करुण आरोपीस तात्काळ आटक करावी अशी मागणी यावेळी निवेदनाद्वारे तहसीलदार मार्फत जिल्हा अधिकारी यांना करण्यात आली. यावेळी देऊळगाव राजा तालुक्यातील व्हाईस ऑफ मिडियाचे उपाध्यक्ष मुशीर खान कोटकर,जिल्हा महिला प्रतिनिधि मराठी पत्रकार परीषदेच्या सुषमा ताई राऊत,व्हाईस ऑफ मिडियाचे तालुका आध्यक्ष अर्जुन कुमार आंधळे,तालुका पत्रकार संघाचे आध्यक्ष गजानन तिडके, मातृतिर्थ पत्रकार संघाचे आध्यक्ष संन्मती जैन, अशोक डोईफोडे, प्रदिप हिवाळे,अशरफ पटेल प्रशांत पंडित, पुजा कायंदे, सुरज गुप्ता, मौ.जमील,किरण वाघ आमोल बोबडे, चंद्रभान झिने या वेळी उपस्थित होते.

# मलकापूर कृउबा समिती सभापतीपदी संजय काजळे पाटील



**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** – मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदाची पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेत संजय काजळे पाटील यांची अविरोध निवड करण्यात आली. मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिव चंद्र तायडे यांच्यावर अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर सदरचा अविश्वास ठराव पारित झाल्यानंतर त्यांनी या अविश्वास विरोधात उच्च न्यायालयात धाव घेत आव्हान दिले होते न्यायालयाने त्यांनी दाखल केलेली याचिका खारीज केल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यासी अधिकारी एम ए कृपलानी यांनी सात जानेवारी रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती च्या सभापतीपदाची निवडणूक प्रक्रिया जाहीर केली होती कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती निवडी करिता आज ७ जानेवारी रोजी आ. चैनसुख संचेती यांच्या नेतृत्वात भाजप शिवसेना महायुतीचे संचालक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दाखल झाले. यावेळी निवडणूक प्रक्रिया अनुषंगाने महायुतीच्या वतीने संजय काजळे पाटील यांनी आपला नामांकन अर्ज दाखल केला तर भाजपच्या योगेश पाटील यांनी सुद्धा आपला नामांकन अर्ज दाखल केला होता. मात्र उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या वेळी त्यांनी आपला अर्ज मागे घेतल्याने सदर निवडणूक ही अविरोध झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यासी अधिकारी एम ए कृपलानी यांनी जाहीर करून सभापतीपदी संजय काजळे पाटील यांची निवड झाल्याचे जाहीर केले यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हजर होते.

संजय काजळे पाटील यांची सभापतीपदी निवड होताच कृषी उत्पन्न बाजार समिती समोर फटाके फोडून जल्लोष करण्यात आला तर संजय काजळे पाटील यांची उपस्थित असलेल्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या

नियमित वाचा
महासागर

# ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक मजदूर संघाचे फलक अनावरण




**सोनाळा (महासागर प्रतिनिधी)** : भारतीय मजदूर संघ संलग्नित ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक मजदूर संघाचे फलक अनावरण व भव्य उद्घाटन सोहळा ६ जानेवारी रोजी सोनाळा येथे पार पडला सोनाळा येथील बस स्टँड परिसरात हा कार्यक्रम या युनियन द्वारे केला गेला यावेळी प्रमुख उपस्थिती मधे मंचावर भारतीय मजदूर संघाचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष प्रा.रविंद्र गणेशे उपस्थित होते तर अध्यक्ष म्हणून प्रदिपभाऊ भुतडा जि.प.सर्कल प्रमुख सोनाळा,प्रकाश बोदडे प्रदेश अध्यक्ष वनवासी ग्रामीण मजदूर महासंघ यांची उपस्थिती होती.यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना प्रदेश अध्यक्ष प्रा.गणेशे म्हणाले की महाराष्ट्र शासनाने कल्याणकारी मंडळाकडून ऑटो रिक्षा टॅक्सी चालकांना पेन्शन व ग्रॅचूइटी द्यावी कारण कुटुंबाचे पोट भरण्यासाठी ऑटो रिक्षा चालक रोज सरासरी दोनशे तीनशे रुपये रोज कमवितो त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो अशा परिस्थितीत महागाई चे काळात व रोड वर सतत अपघाताची जिवीत्वा ची भिती त्यामुळे राज्य शासनाने कल्याणकारी मंडळाकडून राज्यातील सर्व ऑटो रिक्षा टॅक्सी चालकांना पेन्शन ग्रॅचूइटी व सोबतच विमा संरक्षण द्यावे या मागण्या करिता भारतीय मजदूर संघ सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करीत आहे शासन या बाबत लवकरच निर्णय घेईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.सायंकाळी ५ वाजता या कार्यक्रमाला सुरुवात झाली प्रमुख पाहुणे यांचे हस्ते फलक अनावरण व प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.जळगांव जा.मतदार संघाचे आमदार व माजी मंत्री डॉ.संजयजी कुटे यांचा युनियन ला आलेला शुभेच्छा संदेश वाचण्यात आला.नुकत्याच जाहीर झालेल्या कार्यकारीणी चे वाचन केले त्यामधे अध्यक्ष म्हणून राजू दही कार्याध्यक्ष संदीप पोटे सचिव प्रकाश बोदडे उपाध्यक्ष शहेजाद काझी उपाध्यक्ष भरत भटकर सह सचिव किशोर लहुकर कोषाध्यक्ष शेख राजिक सरचिटणीस जुनेद बेग कार्य.सदस्य रामेश्वर बारब्दे सल्लागार विजय लहुकार मार्गदर्शक दिपक देशमुख कार्यालय मंत्री नंदू धारपवार प्रविण बोडखे सहमंत्री अशा प्रकारे या ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक मजदूर संघाची घोषणा करण्यात आली.पत्रकार दिना निमित्त ज्येष्ठ पत्रकार रफिक भाई यांचा सत्कार मंचावरील प्रमुख पाहुण्यांनी केला सोबतच दिलखुलास व्यक्तिमत्व असलेल्या रफिकभाईनी कामगारांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर मा.जि.प.सदस्य प्रमोद खोद्रे, गणेश गोतमारे ओबीसी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष भाजपा,ज्येष्ठ नेते भिमाआप्पा खान्देशे, विनायकराव देशमुख ,मधुसूदन चौबे,संतोषभैया जयस्वाल, निलेश केसाळे, रमेश खोकले, विनोद राठोड,अमोल भाऊ मोदे आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिनदादा अग्रवाल ता.सरचिटणीस भाजपा यांनी केले.कार्यक्रमाला बावनबिर टूनकी लाडणापुर आदी गावातील ऑटोरिक्षा बहुसंख्येने उपस्थित होते.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला फाशीच्या शिक्षा द्या

## मराठा पाटील सेवा समितीची मागणी



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** : मराठा पाटील सेवा समिती व मंडळ जळगाव जामोद तालुका व संग्रामपूर तालुक्याचे वतीने मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला फाशीची शिक्षा द्या या मागणीसाठी आज दिनांक ०६ जानेवारी रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना दिले यासंबंधी निवेदन दिले.

सरपंच संतोष देशमुख यांची हत्या तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू अशा बऱ्याच घटनांमुळे पुरोगामी विचारांचा वारसा असलेला महाराष्ट्राला काळिमा फासला जात आहे. या घटनांवर शासनाने अंकुश घालावा तसेच सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी जळगाव जामोद व संग्रामपूर येथील मराठा पाटील सेवा समिती व मंडळाच्या वतीने निवेदन देऊन करण्यात आली आहे.

यावेळी अँड भाऊराव भालेराव, रंगराव देशमुख, गुलाबराव मारोडे, भिमराव पाटील, गजानन रोठे, श्रीकृष्ण काळे, अमोल दाभाडे, तुकाराम गटमणे, सचिन खुपसे, नारायण मोठे, विजय ठाकरे, मंगेश रोठे, निलेश खुपसे, हरिदास मोरखडे, अजहर देशमुख,रामा रोठे, संजय देशमुख, संजय ठाकरे, डॉक्टर विवेक गावंडे,एजाज देशमुख, प्रभात पाटील यांच्यासह बहुसंख्य मराठा पाटील सेवा समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मिसाल ऐ भारत अवार्डने सुरज यादव सम्मानीत

**खामगाव (का.प्र.)** : रक्तदान क्षेत्रात नेहमी चळवळ सुरू ठेवलेले आपल्या सर्वांचे परिचित खामगांव येथील सामाजिक कार्यकर्ते रक्तमित्र एकनिष्ठा गौ -सेवा रक्तसेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या यादव यांच्या रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले.

त्यांच्या या कामाची दखल घेऊन ६ जानेवारी रोजी मराठी पत्रकार दिनी मिसाल द प्राईड ऑफ सोसायटी पंजाबचे फाउंडर महकप्रीत सिंह, को -फाउंडर यश मोदगिल यांनी मिसाल ऐ भारत अवॉर्ड २०२४/२०२५ प्रशंसा सम्मान पत्र सर्टिफिकेट देऊन सुरजभैय्या यादव यांना सम्मानीत केले. मागील १२ वर्षा पासून एकनिष्ठा गौ - सेवा रक्तसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून आपल्या मित्र मंडळीला सोबत घेऊन नेहमी गरीब, गरजू , दिव्यांग, रूग्णांना वेळोवेळी रक्त पुरवठा करून रक्ताची निशु:ल्क सेवा ते देत आहे आणि विशेष म्हणजे ते स्वतः हुन पण रक्तदान करून रुग्णाला जिवनदान देण्याचे सेवा कार्य त्यांनी सुरू ठेवलेले आहे.

एकनिष्ठा फाउंडेशनच्या रक्तसेवा कार्याची दखल घेऊन त्यांना प्रशंसा पत्र काल ६ जानेवारी रोजी देण्यात आले. त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना प्रशंसा पत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# तहसीलदारांच्या पथकाच्या कारवाईने रेती माफीयांचे धाबे दणाणले

## जळगाव जामोद तालुक्यात आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)**: तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या रेतीमाफीयांनी हैदोस घातला होता. विनापरवाना पूर्णा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा चालू होता. रेती चोरीचा नवीन प्रकार केणी मशीनद्वारे पाण्यातून रेती सर्रास काढल्या जात होती. यासंबंधी अनेक वेळा बातम्या ठोकुन महसूल विभागाच्या ढिसाळ कारभाराचा पंचनामा केला होता.

तसेच दोन दिवसा अगोदर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना चे जळगाव जामोद तालुकाप्रमुख गजानन वाघ यांनी सुद्धा मोठ्या आंदोलनाचा इशाराच दिला होता. त्यावर तहसीलदार पवन पाटील यांनी पूर्णा नदी पात्रातील अवैध रेती उपसा याबाबत कारवाई करण्यास सुरुवात केली. या मोहिमेसाठी त्यांनी कोणतेही गावातून जाणे टाळले व दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी तहसीलदार पवन पाटील व तारासिंग पवार यांचे सह एनडीआरएफ पथक जिल्हाधिकारी तसेच अप्पर जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांचे मार्गदर्शनात पथक तयार करून तहसीलदार पवन पाटील नायब तहसीलदार भरत किटे, भारसाकडे, मंडल अधिकारी सातपुते यासह सर्व तलाठी कोतवाल यांच्या पथकाने पूर्ण नदीत बोटीसह उतरून मौजे गोळेगाव हुरसाड या भागात धडक कारवाई केली. या कारवाई दरम्यान तहसीलदार यांचे पथक पाहून रेती माफियांनी पूर्णा नदी पात्रातून आपल्या वाहनासह पोबारा केला. यावेळी तहसीलदार पवन पाटील यांच्या पथकाने घटनास्थळावरून नदीपात्रातील पाण्यातुन रेती काढण्याचा सक्शन पंप, दोन ट्रॅक्टर आणि तीन केणी मशीन जप्त करण्यात आले आहेत. पुढील कारवाईसाठी जप्त केलेला मुद्देमाल तहसील कार्यालय येथे जमा करण्यात आला आहे. सदरची कारवाई दरम्यान पोलीस स्टेशनचे पीएसआय अमोल पंडित, पीएसआय नागेश खाडे, पीएसआय नारायण सरकटे यांनी घटनास्थळी भेट दिली. रात्री उशिरापर्यंत संबंधित रेती माफियांवर गुंन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

तहसीलदार पवन पाटील यांनी केलेले या कारवाईमुळे तालुक्यामध्ये अवैधरीत्या रेती तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणल्याचे दिसून येत आहे. जळगाव जामोद महसूल प्रशासनाने आतापर्यंत ही अशी एकही मोठी कारवाई केली नव्हती हे विशेष. यावेळी तहसीलदार पवन पाटील यांनी दैनिक महासागर शी बोलताना सांगितले की मागील महिन्यात येते संदर्भात अनेक कारवाया करण्यात आल्या त्यामध्ये दहा वाहनांवर कारवाई करून जवळपास ७०० ब्रॉस रेती जप्त करण्यात आली. अशाच प्रकारे रेती माफियांवर कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

RNINO-46973/1986 महासागर वाशीम
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,महात्मा फुले मार्केट,पाटणी चौक,वाशीम येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७६२२८-९३७३११७०४२ स्थानिक संपादक-नितीन पगार मो.नं.९८२२७४९४७० (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबारी यांचेवर राहिल.)

